# सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, भिवंडी तालुका यांचे कार्यालय

दत्तात्रेय कृपा बिल्डींग ३ रा माळा, स्टेट बॅंकेसमोर, जकात नाका, सेंन्ट्रल हॉस्पीटलच्या वर, भिवंडी, जि. ठाणे

---

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७अ (१)(ब-१) अन्वये आदेश

---

जा.क्र.सनिभि/बी-१/कलम ७७ अ/प्राधिकृत अधिकारी/ ८९८/सन २०१७
दिनांक :- २२/०९/२०१७

वाचावे :- १) सिध्दिविनायक प्लाझ्र को-ऑप- हौसिंग सोसायटी लि.टेमघर ता.भिवंडी या संस्थेच्या संचालक मंडळाने सामुहिक राजीनाम्याद्वारे या कार्यालयांस दिनांक १३/०९/२०१७ रोजी सादर केलेला प्रस्ताव.

२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ ची तरतूद

ज्याअर्थी, सिध्दिविनायक प्लाझ्र को-ऑप- हौसिंग सोसायटी लि.टेमघर ता.भिवंडी जि.ठाणे ही ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९ अन्वये नोंदणीकृत संस्था असून तिचा नोंदणी क्र. टिएनए/बीडब्ल्यूआय/एचएसजी/(टिसी)/२४८४७/सन २०१३, दिनांक ०३/०५/२०१३ असा आहे आणि, ती या कार्यालयाच्या कार्यकक्षेत येते. आणि,

ज्याअर्थी, संस्थेचे कामकाज महाराष्ट्र सहाकारी अधिनियम १९६० व नियम १९६१ व संस्थेच्या मंजुर उपविधीतील तरतुदीनुसार चालविणे बंधनकारक आहे आणि,

ज्याअर्थी, संस्थेचे संचालक मंडळाची संख्या ११ असून संस्थेचे सद्याचे विद्यमान १० संचालक असून त्यापैकी ०६ संचालकांनी सामुहिकरित्या राजीनामे दिल्याने संस्थेचे समिती सदस्यांची संख्या फक्त ०४ राहीलेली असल्याने कमिटी गठीत होत नसल्याने संस्थेच्या कामकाजामध्ये कायदेशीर पोकळी निर्माण झालेली आहे. त्यामुळे संस्थेच्या व्यस्थापक समितीस कोणतेही कायदेशीर अस्तित्व प्राप्त होत नाही.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ मधील तरतूदीनुसार सदयाचे अस्तित्वात असलेल्या व्यवस्थापक समितीस कायदेशीर अस्तित्व प्राप्त होत नाही संस्थेचे दैनंदीन कामकाज ठप्प झालेले असल्याने प्रस्तुत प्रकरणी तात्काळ कारवाई करणे आवश्यक असल्याने नोटीस प्रसिध्द करण्यांची आवश्यकता नसल्याची माझी खात्री झाल्याने मी खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

### -: आ दे श :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ (१)(ब-१) मधील तरतुदी अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी आर.एस.लोखंडे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, भिवंडी, ता. भिवंडी, जि. ठाणे सिध्दिविनायक प्लाझ्र को-ऑप- हौसिंग सोसायटी लि.टेमघर ता.भिवंडी जि.ठाणे या संस्थेची व्यवस्थापक समिती निष्काशित करण्यांत येवून सदर संस्थेचे दैनंदिन कामकाज करण्यासाठी प्राधिकृत अधिकारी म्हणून श्री.सुदाम हजारे, प्रमाणित लेखापरीक्षक यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून सहा महिन्याच्या कालावधीसाठी करण्यात येत आहे. सदर कालावधीमध्ये